# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** श्रीरामपूर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1209 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/12/2024 14:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 18/09/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/09/2024
**Time From (वेळेपासून):** 12:39 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/12/2024 **Time (वेळ):** 14:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 014
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/12/2024 14:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मंडळाअधिकारी कार्यालय, श्रीरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** ज्ञानेश्वर शांताराम थोरात
**(b) Father's/Husband's Name(वडीलांचे / पतीचे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट, यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गळनिंब, ताश्रीरामपुर, जिअहि,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गळनिंब, ताश्रीरामपुर, जिअहि,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7620903869

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (**माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शहाजी वडीतके | | | 1. मांडवे ता श्रीरामपुर ,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (**तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

**9. Particulars of properties of interest (**संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 31/12/2024
मी ज्ञानेष्वर शांताराम थोरात, वय-36 वर्षे, धंदा-षेती, रा.गळनिंब, ता.श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर, मो.नं. 7620903869.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटं्ुबासह राहण्यास असुन मी दि.18/09/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांना फोनवर संपर्क करून लोकसेवक श्री.मंडलिक, मंडळअधिकारी, बेलापूर, श्रीरामपूर व त्यांचे खाजगी मदतनीस वडीतके यांचेविरोधात मी दाखल केलेल्या हरकत अर्जप्रकरणामध्ये केसचा निकाल माझ्या बाजुने देण्यासाठी लाचमागणी करत असलेची तक्रार सांगुन सदर लोकसवेक यांना आज दिनांक 18/09/2024 रोजी त्यांचे कामा सबंधाने भेटणार असल्याचे कळविले. त्यानंतर दि.18/09/2024 रोजी पोनि आल्हाट हे श्रीरामपूर येथे सुरक्षित ठिकाणी सापळा पथकासह हजर झाले त्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी देखील सुरक्षित ठिकाणी हजर होतो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझी सापळा पथकाची व दोन पंचांची ओळख करून दिली. त्यावेळी पंचांसमक्ष पोनि आल्हाट यांनी मला माझी लाचे संबंधाने तक्रार विचारली असता मी पंचांसमक्ष सांगितले की, दि. 31/07/2024 रोजी मी तलाठी कार्यालय, मौजे गळनिंब ता.श्रीरामपूर येथे सौ.ताईबाई नामदेव मारकड यांनी श्री.भडं्ागे यांचेकडुन खरेदी केलेल्या क्षेत्राची खरेदीखताची नोंद सातबाÚयावर न घेण्याकरीता हरकत अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी श्री.मंडलिक, मंडळअधिकारी, बेलापुर, ता.श्रीरामपूर यांच्याकडे चालु असुन सदर केस संदर्भात दि.11/09/2024 रोजी श्री. मंडलिक, मंडळ अधिकारी, बेलापुर यांनी मला त्यांचा कार्यालयात बोलावुन घेवुन सांगितले की, सदर केसचा निकाल तुमच्या बाजुने दयायचा असेल तर मला 10,000/- ते 15,000/- रूपये दया. त्यानंतर मी श्री.मंडलिक यांचे कार्यालयात मागील बÚयाच वर्षापासुन त्यांचे खाजगी मदतनीस म्हणुन काम करणारे माझे परिचयाचे श्री.वडीतके यांची भेट घेवुन त्यांना मंडलिक भाउसाहेब हे माझे बाजुने निकाल लावण्यसाठी 10,000 ते 15,000/- रूपये दयायला सांगत असलेबाबत सांगितले. त्यावेळी खाजगी मदतनीस वडीतके यांनी, तुम्ही 10,000/- रूपये घेवुन या, मी तुमचे काम मंडलिक भाउसाहेबांकडुन करून घेतो, असे सांगितले. मी दाखल केलेल्या हरकत अर्जप्रकरणामध्ये केसचा निकाल माझ्या बाजुने देण्यासाठी मंडळअधिकारी श्री.मंडलिक व त्यांचे खाजगी मदतनीस वडीतके हे लाचमागणी करत असलेबाबतची सविस्तर तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला माझी वरील तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. सदर तक्रारीवर मी सही केली व त्यानंतर दोन्ही पंच व पोनि आल्हाट यांनी सहया केल्या.

त्यानंतर लोकसेवक श्री.मंडलिक, मंडळअधिकारी, बेलापूर, श्रीरामपूर व त्यांचे खाजगी मदतनीस वडीतके यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेका्ॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर ्पोनि आल्हाट यांनी व्हाईस रेका्ॅर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेका्ॅर्डर चालू करून, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेका्ॅर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या.

त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाईस रेका्ॅर्डर चालु करून माझ्या ताब्यात देवुन मला पंच नं 1 अशांना मंडळाअधिकारी कार्यालय, श्रीरामपूर येथे लोकसेवक श्री.मंडलिक व त्यांचे खाजगी मदतनीस वडीतके यांची मंडळअधिकारी कार्यालय, श्रीरामपूर येथे भेट घेण्यासाठी 12/39 वा. सुमारास रवाना केले. सदर भेटीदरम्यान लोकसेवक श्री.मंडलिक यांनी माझे सोबत लाचेसंदर्भात बोलणे केले नाही. परंतु मागील अनेक दिवसांपासुन मंडळअधिकारी कार्यालयात लोकसेवक श्री.मंडलिक यांचे मदतीकरीता असणारे त्यं्ाचे खाजगी मदतनीस

वडीतके यांनी मी दाखल केलेल्या हरकत अर्जप्रकरणामध्ये केसचा निकाल माझ्याबाजुने देण्याकरीता माझ्याकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच नं 1 असे मोटार सायकलवरून 13/33 वा. सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातली व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन तो बंद केला. त्यानंतर मी व पंचांनी वरील प्रमाणे घडलेली हकिकत सांगितली.

त्यानंतर पोनि आल्हाट व दोन्ही पंचानी माझ्यात व लोकसेवक मंडलिक व खाजगी इसम वडितके यांचेत झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक मंडलिक, मंडळअधिकारी यांनी माझ्याकडे लाचेसंदर्भात बोलणे केल्याचे दिसुन येत नाही परंतु लोकसेवक मंडलिक, मंडळअधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात मदतीकरीता ठेवलेले त्यांचे खाजगी मदतनीस शहाजी वडीतके यांनी मी दिलेल्या दिलेला अर्जाचा निकाल माझ्या बाजुने देणेकरीता लोकसेवक मंडलिक, मंडळअधिकारी यांच्याकरीता 10,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले. त्यामुळे खाजगी मदतनीस शहाजी वडीतके यांचे विरूध्द सापळा लावण्याचे ठरले.

त्यांनतर मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेले 10,000/- रुपये रोख रक्कम त्यात 500/- रुपये दराची 18 भारतीय चलनी नोटा व 200/- रूपये दराच्या 05 भारतीय चलनी नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले त्यानंतर त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या शर्टच्या समोरील बाजुच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला पोनि आल्हाट यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व पंचाची खात्री करून दिली व लाच रककम स्विकारल्यानंतर त्याबाबत नियोजित इशारा ठरवुन दिला.

त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर चालू करून माझे ताब्यात देवुन मला पंच नं.1यांचेसह खाजगी इसम वडितके यांची भेट घेण्याकरीता मंडळाधिकारी कार्यालय, श्रीरामपूर येथे जाण्यासाठी माझे कडील मोटार सायकल ने रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि आल्हाट, पंच नं. 02, सापळा पथकातील कर्मचारी असे शासकिय वाहनाने येवुन मंडळाधिकारी कार्यालच्या आवारात कोणास काही एक संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. पोनि आल्हाट व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच नं. 1 अषांनी खाजगी मदतनीस वडीतके यांची मंडळअधिकारी कार्यालय, श्रीरामपुर येथे भेट घेतली. त्यावेळी खाजगी मदतनीस वडीतके यंानी त्यांच्या मोबाईलमधील माझ्या केसच्या निकालाचा फोटो दाखवुन आता बिनधास्त जा, मी तुम्हाला काय झाले ते दोन ते तीन दिवसांनी सांगेल असे म्हणुन माझेकडुन लाचेची रक्कम न स्विकारता तेथुन निघुन गेले.

त्यांनतर मी व पंच नं 1 असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावर मी घडलेली हकिकत पोनि आल्हाट यांना सांगितली. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले ते मी सांगितलेल्या हकिकतीशी मिळते जुळते होते.

त्यावेळी मी पोनि आल्हाट यांना सांगितले की, मंडळअधिकारी मंडलिक यांचे खाजगी मदतनीस वडीतके यांनी मला सांगितले की, दोन ते तीन दिवसांनी काय झाले ते सांगतो, यावरून ते मला दोन ते तीन दिवसानंतर संपर्क करतील. तरी आज रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करावी व खाजगी मदतनीस वडीतके यांनी माझ्याशी संपर्क केल्यास मी आपणास त्वरीत संपर्क करेल त्यावेळी सापळा कारवाई आयोजित करावी. त्यानुसार माझा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे सर्वानुमते सदर कारवाई तात्पुरती स्थगित करून सदर सापळा कारवाई ही खाजगी मदतनीस वडीतके यांनी माझ्याशी संपर्क केल्यानंतर आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर दि.13/11/2024 रोजी मी पोनि आल्हाट यांना फोन करून कळविले कि, माझ्या निकालाची प्रत घेणेकरीता मी मंडळअधिकारी कार्यालय येथे जाणार असुन सदर वेळी खाजगी मदतनीस वडीतके हे माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम 10,000/- रूपये स्विकारण्याची शक्यता आहे. तरी आज रोजी सापळा कारवाई आयोजित करावी असे कळविल्यावरून पोनि आल्हाट यांनी श्रीरामपुर येथे पंच व सापळा पथकासह येवुन मला व पंच नं.1 यांना सुचना देवुन खाजगी मदतनीस वडीतके यांना देण्याकरीता मी दिनांक 18/09/2024 रोजी सादर केलली लाच रक्कम सिलबंद पाकीटामधुन बाहेर काढून माझ्याकडे दिली व त्यानंतर मला व सोबत पंच नं.1 यांना मंडळअधिकारी कार्यालय येथे खाजगी मदतनीस वडीतके यांची भेट घेण्याकरीता पाठविले त्यानुसार मी व पंच नं 1 असे मंडळअधिकारी कार्यालयात गेलो परंतु सदरचे कार्यालय बंद होते. त्यावेळी माझ्या मोबाईल नंबर 7620903869 यावरून खाजगी इसम वडितके यांच्या मोबाईल नंबर 9960903041 यावर कॉल करून स्पीकर आॅन करून बोलणे केले त्यावेळी त्यांनी कार्यालय बंद असल्याचे संागुन उदया चालु असल्याचे सांगितल. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन ज्या ठिकाणी शासकिय वाहन उभे केले होते तेथे आलो. त्यानंतर मी तसेच पंच नं.1 यांनी पोनि आल्हाट यांना घडलेली हकिगत संागितली.

त्यानंतर मी पोनि आल्हाट यांना कळविले की, आपण आज रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून

विधानसभा निवडणुक पार पडल्यानंतर किंवा त्यादरम्यान खाजगी मदतनीस वडीतके यांनी माझ्याशी संपर्क केल्यानंतर सापळा कारवाई आयोजित करावी, असे कळविले. त्याप्रमाणे सर्वानुमते दिनांक 13/11/2024 रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दि.20/12/2024 रोजी मी पोनि आल्हाट यांना फोन करून कळविले कि, माझ्या निकालाची प्रत घेणेकरीता मी दिनांक 23/12/2024 रोजी मंडळअधिकारी कार्यालय येथे जाणार असुन सदर वेळी मंडळअधिकारी श्री.मंडलिक यांचे खाजगी मदतनीस वडीतके हे माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम 10,000/- रूपये स्विकारण्याची शक्यता आहे. तरी दि.23/12/2024 रोजी सापळा कारवाई आयोजित करावी असे कळविल्यावरून पोनि आल्हाट हे दि.23/12/2024 रोजी श्रीरामपुर येथे पंच व सापळा पथकासह येवुन मला व पंच नं.1 यांना सुचना देवुन खाजगी मदतनीस वडीतके यांना देण्याकरीता मी दिनांक 18/09/2024 रोजी सादर केलली लाच रक्कम सिलबंद पाकीटामधुन बाहेर काढुन माझ्याकडे दिली व त्यानंतर मला व सोबत पंच नं.1 यांना मंडळअधिकारी कार्यालय येथे खाजगी मदतनीस वडीतके यांची भेट घेण्याकरीता पाठविले असता आम्ही मंडळअधिकारी कार्यालयात येथे जावुन खाजगी मदतनीस वडीतके यांची भेट घेवुन माझ्या निकालाची प्रतची मागणी केली असता, ते मला म्हणाले तुम्हाला रेकॉर्डरूमला अर्ज करावा लागेल, त्यानंतर ते आमच्याकडे येईल, मग आम्ही रेकॉर्डरूमकडे पाठवुन देव,ु त्यानंतर तुम्हाला नकलची प्रत मिळेल, असे मला सांगितले. त्यावेळी त्यांना माझा काहीतरी संषय आल्याने ते व त्यांच्या बाजुला असलेले मंडळअधिकारी श्री.मंडलिक हे कार्यालयातुन निघुन गेले. त्यानंतर मी व पंच नं.1 असे सुरक्षित ठिकाणी परत आलो व घडलेली हकिगत पोनि आल्हाट यांना संागितली.

त्यानंतर मी पोनि आल्हाट यांना सांगितले की, मंडळअधिकारी श्री.मंडलिक यांचे खाजगी मदतनीस वडीतके यांना माझा संशय आल्यामुळे ते भविश्यात माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाही, याची मला खात्री झाली आहे. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून आजपावेतो झालेल्या कारवाई वरून पुढिल कायदेषीर कारवाई करण्यात यावी. तसेच सापळा कारवाई पुर्णतः स्थगिती बाबतचा सविस्तर जबाब लिहुन दिला. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला सदर सापळा कारवाई बाबत गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या.

तरी दि.18/09/2024 रोजी 12/39 ते 13/33 वा.चे दरम्यान मंडळाअधिकारी कार्यालय, श्रीरामपूर येथे लाच मागणी पडताळणी कारवाई च्या वेळी मंडळअधिकारी श्री.मंडलिक यांनी त्यांचे कार्यालयात मदतीकरीता ठेवलेले खाजगी मदतनीस शहाजी वडीतके यांनी मी दाखल केलेल्या हरकत अर्जप्रकरणातील केसचा निकाल माझे बाजुने देण्यासाठी मंडळअधिकारी श्री.मंडलिक यांचेकरीता 10,000/- रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शवली म्हणुन माझी खाजगी मदतनीस श्री. शहाजी वडीतके रा.मांडवे, ता. श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NITIN BHASKARAO DESHMUKH(I (Inspector)) / PBMH76693 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
श्रीरामपूर शहर पो.स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): NITIN BHASKARAO D
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH76693